नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 03/05/2021 (सोमवार)

(सायंकाळ)

---

## खापा येथील क्रिकेट सट्टा अड्डयावर धाड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक 02/05/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलिस ठाणे खापा हद्दीत गस्तकरित असतांना त्यांना गोपनीय माहितगारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, बिचवा–वरपानी रस्त्याचे बाजुला असलेल्या एका शेतात काही इसम हे आयपीएल लीगच्या क्रिकेट सामन्यावर खायवाडी करित आहेत. अश्या प्राप्त माहितिच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने 17.40 वाजता बिचवा–वरपानी डांबरी रस्त्याचे बाजुला असलेल्या एका शेत शिवारातील टीनाचे शेडमध्ये धाड टाकली असता तेथे आरोपी क्र. 1) कार्तिक गणेश भट, वय 28 वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी, नागपूर, 2) रितेश कृष्णाजी ठाकरे, वय 35 वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी, नागपूर, 3) पवन पुरूषोत्तम इंगळे, वय 30 वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी, नागपूर, 4) श्रीकांत गणेश भट, वय 32 वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी, नागपूर, 5) ईशांत इर्शाद खान, वय 28 वर्ष, रा. जाफर नगर नागपूर, 6) आशिष लक्ष्मण गोयले, वय 27 वर्ष, रा. वोक्स कुलर, कोराडी नाका चौक, नागपूर हे दुरचित्रवाणीवर सुरु असलेल्या सनराईजर्स हैद्राबाद विरुध्द राजस्थान रॉयल्स या सामन्यावर त्यांचे आर्थीक फायद्याकरीता मोबाइल फोनवर बोलून खायवाडी करतांना मिळुन आले.

आरोपीतांच्या ताब्यातून क्रिकेट सट्टा करिता वापरण्यात येत असलेला
1 टीव्ही संच, 12 मोबाइल व रोख रक्कम 9140/– रुपये अशाप्रकारे एकुण 1,90,339/– रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिस ठाणे खापा येथे आरोपीतांविरूद्ध अप.क्र. 122/2021, महाराष्ट्र जुगार कायद्याचे कलम 12(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात येउन आरोपीतांना पुढिल कायदेशीर कार्यवाही करिता पो.स्टे. खापा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री राहुल माकनीकर, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., यांचे मार्गदर्शना खाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे आदेशाने सपोनि राजीव कर्मलवार, पोउपनी सचिन मत्ते, हेकॉ नाना राऊत, नापोशी राजेंद्र रेवतकर, पोशि रोहन डाखोरे, पोशि विपिन गायधने, अमोल वाघ, मपोशी नम्रता बघेल व सफौ साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर